“शशिकला क्षयरोग आरोग्य धाम रुग्णालय, जससिंगपूर, जि. कोल्हापूर येथील आहार सेवा सुरु ठेवण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय, क्रमांकः संकीर्ण २०१७/प्र.क्र. २४२/आरोग्य ३

१० वा मजला, संकुल इमारत,

जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.

दिनांक : २१ मार्च, २०१८.

वाचा :

१) सह संचालक, आरोग्य सेवा कुष्ठरोग व क्षयरोग, पुणे यांचे पत्र क्रमांक-ससंआसे/क्षयवबीसीजी/भांडार/आहार ई-निविदा/मंजूरी/१४२२६-२८/१७, दिनांक २८.१२.२०१७.

शासन निर्णय:

शशिकला क्षयरोग आरोग्यधाम जससिंगपूर जि. कोल्हापूर या रुग्णालयातील रुग्णांसाठी आहार सेवा पुरविण्याकरीता रु. १४.०० लक्षच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्यामधून प्रती दिन प्रती रुग्ण या प्रमाणे थाळी पध्दतीने जेवन देण्यात येणार असून त्यामध्ये त्यामध्ये भात, वरण, चपाती, भाजी, शिरा पोहे, उपमा, पापड, लोणचे इत्यादी पदार्थाचा समावेश करण्यात येत आहे. सदर आहार सेवा राबविण्यासाठी खालील अटी व शर्तीचा अवलंब करण्यात यावा.

२.अटी व शर्ती-:

१. सदर खरेदीसाठी शासन निर्णय, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/ भाग III/उदयोग-४, दि.०१.१२.२०१६ अन्वये प्रसिध्द केलेल्या सुधारीत नियमपुस्तिकेत विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

२. खरेदी करावाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical Specification) संबंधीत तज्ञांनी (तांत्रिक समिती/अधिकारी) मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच सदर तांत्रिक विनिर्देश कोणत्याही

पुरवठादारास फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच त्याबाबींची खरेदी करण्यात यावी.

३. प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत.त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती निश्चित करण्यात आलेला दर हा बाजारभावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधीत पुरवठादाराने या बाबींचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

४. खरेदी करण्यात येणा-या बाबींची पुरवठापुर्व व पुरवठयानंतर नमुना तपासणी (Pre/post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विर्निदेश असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात यावी.

५. खरेदी करण्यात येणा-या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (Storage and Distribution) करणे तसेच पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply Chain management) व वस्तुसुची व्यवस्थापन (inventary Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहित मुदतीत वापर होईल याची दक्षता घेण्यात यावी.

६. सदर खरेदीची व्दिरुक्ती (Duplication) होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

७) मार्गदर्शक सूचनांचे संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबवितांना केंद्रीय दक्षता आयोगाच्या (CVC Guidelince) तंतोतंत पालन करण्यात यावे.

९. खरेदी प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर केंद्रीय खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमीत करण्यात यावेत.

१०. सदर खरेदी ३.०० लक्ष पेक्षा जास्त असल्याने ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करण्यात यावी.

३. सदर प्रस्तावातील २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य (०४) इतर रुग्णालय व दवाखाने (०४) (०१) क्षयरोग रुग्णालये व आरोग्यधामे (राज्य क्षेत्र) (अनिवार्य) (२२१० ०१९१) १९, आहार खर्च या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, शासन निर्णय, शासन निर्णय-विअप्र.वित्त विभाग क्र, १७.४.२०१५.दि ,२-विनियम भाग/२०१३/३०.क्र.प्र/२०१३सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार

नियम पुस्तिका ७.नियम क्र,४.क्र.दोन मधील अ-उपविभाग ,भाग पहिला,१९७८,अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१५१५०४४४५९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.03.21 17:16:24 +05'30'

(रो.दि.कदम पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल- १ / २, महाराष्ट्र, (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सह संचालक, आरोग्य सेवा, (कुष्ठरोग व क्षयरोग), पुणे.
५. अधिक्षक, शशिकला क्षयरोग आरोग्य धाम, जससिंगपूर जि. कोल्हापूर.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर.
७. वित्त विभाग (कोषागारे/ प्रशासन ५), मंत्रालय, मुंबई.
८. कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती (कार्यासन आरोग्य-३).